FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ११/१८, वर्ष Year २०१८, दिनांक Date १५/०३/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि.१९८८ कलमे Sections ७,१३(१)(ड) सह १३(२)
   (ii) अधिनियम Act ..., कलमे Sections ...
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day गुरुवार, तारीख पासून Date from १४/०३/१८ वेळ Time १४.०० वा तारीख पर्यंत Date to १५/०३/१८ वेळ Time १८.०० वा
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १४/०३/२०१८ वेळ Time १४.०० वा
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ०२/२०१८ तारीख Date १६/०३/१८ वेळ Time ०४.३० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी, लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ..., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. Chouki / Beat / O.P. Name and No.
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव, ठिकाणाचे नंबर, गल्ली, रस्त्याचे नाव Address of Occurrence Name, No. if any, Ward, Name of road: जय माता दी प्रापर्टी कन्सल्टन्ट ऑफीस न्यु शिवल सरिता अपार्टमेन्ट गाळा नं.०६ पोद्दार रोड गोल गार्डन मालाड (पु) मुंबई ९७
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..., गाव Village ..., पोस्ट Post ..., तालुका Taluka मुंबई, जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..., तालुका Taluka ..., जिल्हा Dist. ..., राज्य State ...

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name कल्पेश भुपेंद्रभाई शाहा (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name श्री. भुपेंद्रभाई शाहा
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age ३८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ७७२२०००२२२
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..., दिल्याचा दिनांक Date of Issue ..., दिल्याचे ठिकाण Place of Issue ... (f) व्यवसाय Occupation स्टील खरेदी व विक्री करणे
   (g) धर्म Religion जैन, जात Caste दसरोल २७ जनजात Sub-Caste ...
   (h) पत्ता Address : ..., गल्ली / सर्व्हे नं. Ward ..., घर / नाव नं. House/Name No. ..., फोन / मो. नं. Phone/M. No. ..., पॅन नं. PAN No. ..., वोटर्स नं. Card No. ...
   रस्त्याचे नाव Road २३, भुपेंद्र निवास जितेंद्र रोड मालाड (पुर्व), जवळचे ओळख चिन्ह Nearest identifiable place, गाव Village ..., पोस्ट Post मुंबई, पो. स्टे. P. Stn. ...
   तालुका Taluka ..., जिल्हा Dist. मुंबई, राज्य State महाराष्ट्र, सध्याचा पत्ता Present Address ...

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   जितेंद्र पांडुरंग खंडागळे वय ३६ वर्षे धंदा - नोकरी (बृहन्मुंबई महानगरपालिका कनिष्ठ अभियंता इमारत व कारखाने विभाग पी-उत्तर मुंबई रा.ठी. C-३०४ बिल्डींग नं.१ न्यु म्हाडा कॉलनी नागरी निवास जवळ, गोरेगांव पुर्व मुंबई-६७

यातील फिर्यादी श्री. कल्पेश भुपेंद्रभाई शहा, वय ३९ वर्षे, व्यवसाय- स्टील खरेदी विक्री रा.ठि. २३/भुपेंद्र निवास जितेंद्र रोड, मालाड (पुर्व) मुंबई - ४०००९७ यांचा स्वतंत्र पानावर नोंदविलेला फिर्यादी जबाब प्रथम खबरी अहवाल म्हणून संबोधण्यास आला असून तो सोबत जोडण्यात आला आहे.

समक्ष.

(सही)

(गणेश खोकटे)
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक, मुंबई विभाग
मुंबई.

मी कल्पेश भुपेंद्रभाई शहा असे लिहून देतो कि, मला प्रथम खबरी अहवालाची व सापळा पंचनाम्याची अनु.क्र. ०१ ते १८ पृष्ठ विनामुल्य मिळाली म्हणून सही करतो.

Kalpesh.B.Shah.
(Kalpesh.B.Shah)

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे कार्यालयीन प्रक्रियेनंतर त्वरीत

Reasons for delay in reporting by the Complainant/Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील नमूद दि. वेळ व ठिकाणी यातील आलोसे यांनी फिर्यादी यांचे बांधकाम चालू असलेल्या निवासस्थानी भेट देवून सदरचे बांधकाम बेकायदेशीर असून ते चालू ठेवण्यासाठी तसेच कारवाई न करण्यासाठी फिर्यादी कडून रुपये ४०,०००/- ची लाचेची मागणी करुन, भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाने परितोषण म्हणून स्विकारले म्हणून गुन्हा कलम ७,१३(१) (ड) सह १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ......, जिल्हा ......, राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant. Jaibh. B. Shah (Kailesh B Shah)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही. [signature] PI

Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name (गणेश केशव थोरट)

पदनाम Rank पोलीस निरिक्षक

तपासिक अं. चा कोड क्र. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

Posting

Code No. of I. O.

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख..........

1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

—फिर्याद— दिनांक— १५/०३/२०१८

श्री. कल्पेश भुप्रेंद्रभाई शहा, ३९ वर्षे, धंदा—व्यापार, राठि— २३/भुप्रेंद्र निवास, जितेंद्र रोड, मालाड (पुर्व) मुंबई— ४०००९७, मो.क्र. ७७२२०००२२२.

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्यावर माझे कुटूंबीयांसोबत जन्मापासून राहत आहे. माझे स्टील ट्रेडिंगचा व्यवसाय असून सदर व्यवसाय मी माझे घरातून करतो. सदर व्यवसायाचे उत्पन्नावर माझे कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

माझे अजोबा श्री. किर्तीभाई दायाभाई शहा यांचे नावावर वासनवाला बिल्डींग, हाजी पाबू रोड, मालाड (पूर्व), मुंबई—९७ येथे ९०० चौरस फुटाचे एक मजली निवासस्थान आहे. सदर निवासस्थानामध्ये गेल्या ४० वर्षापासून माझे कोणीही कुटूंबीय रहात नसल्याने घराची दुरुस्ती करणे आवश्यक होती. त्यामुळे मी गेल्या एक महिन्यापासून सदर निवासस्थान दुरुस्तीचे काम चालू केले आहे.

दिनांक १०/०२/२०१८ रोजी माझा मोबाईल क्रमांक ७७२२०००२२२ वर एक मोबाईल क्रमांक ९७५७१०३१९० वरुन फोन आला व त्यांनी स्वत:चा परिचय श्री. जितेंद्र खंडागळे, बी.एम.सी. इंजिनियर असे सांगून 'मी तुमचे घरी आलो असून, तुमच्या घराचे दुरुस्तीचे काम चालू असुन ते बेकायदेशीर आहे. सदरचे काम आत्ताच्या आत्ता बंद करा, तुमच्या घराचे दुरुस्तीचे काम चालू ठेवायचे असेल तर काय करायचे ?' असे म्हणाले, तेव्हा मी श्री. खंडागळे यांना बोललो की मी सद्या मुंबईचे बाहेर असून दोन—तीन दिवसा नंतर परत येत आहे. मुंबईत आल्यानंतर मी आपल्याला भेटतो असे बोलून मी फोन बंद केला.

दिनांक १२/०२/१८ रोजी सकाळी ११.३० वा. मी वासनवाला बिल्डींग, मालाड (पुर्व) येथे येवून निवासस्थानाचे दुरुस्तीचे काम कसे चालू आहे हे पहात असताना श्री. जितेंद्र खंडागळे हे तेथे आले व त्यांनी स्वत:ची ओळख करुन दिली व मला म्हणाले की, तुम्ही घर दुरुस्ती करण्यासाठी बी.एम.सी.ची परवानगी घेतली नाही. आता काय करायचे ते सांगा? काम चालु ठेवायचे असेल तर मला रु. ७५,०००/— द्यावे लागतील. तेव्हा मी बी.एम.सी. इंजीनिअर श्री. खंडागळे यांना बोललो कि, माझेजवळ एवढे पैसे नाहीत त्यावर श्री. खंडागळे मला बोलले की, मला रु. ४०,०००/— द्यावे लागतील. त्यावर मी त्यांना बोललो की कांहीतरी तरतुद करतो असे म्हणाल्यावर बी.एम.सी. इंजीनिअर श्री. खंडागळे हे तेथून निघून गेले.

त्यानंतर दोन दिवसांनी बी.एम.सी. इंजीनिअर श्री. खंडागळे यांनी माझे मोबाईलवर संपर्क साधून मला गोल गार्डनचे बाजूला मालाड (पूर्व) येथे जय मातादी ऑफिस मध्ये बोलाविले होते त्यावेळी मी त्यांना रु. ३०,०००/— दिले आहेत.

त्यानंतर एक आठवडया नंतर श्री. खंडागळें यांनी माझे मोबाईलवर संपर्क साधून म्हणाले की, तुमचे विरुध्द बी.एम.सी ऑफिसमध्ये बऱ्याच तक्रारी आलेल्या आहेत. तसेच नगरसेवक श्री. राम बारोट यांनीही तुमचे बांधकामा विरुध्द तक्रार केलेली

आहे. तुम्ही मला अजून रु. २०,०००/— द्या मी सर्व कांही सांभाळून घेतो असे बोलल्याने मी दोन दिवसा नंतर श्री. खंडागळे यांना रु. २०,०००/— दिले आहेत.

दिनांक १३/०३/२०१८ रोजी सकाळी पुन्हा श्री. खंडागळे यांनी माझे मोबाईलवर फोन करुन सांगितले की, तुमचे विरुध्द बऱ्याच तक्रारी येत आहेत. उद्या तुम्ही मला भेटा मी तुमचे घरी येतो असे बोलून फोन बंद केला.

त्यानंतर दिनांक १४/०३/२०१८ रोजी सकाळी ११.०० वा. श्री. खंडागळे हे माझे वासनवाला बिल्डींग, हाजी बापू रोड, मालाड (पूर्व), मुंबई—९७ येथे आले आणी मला म्हणाले की, तुम्ही तुमच्या विरुध्द तक्रार करणाऱ्या लोकांना पैसे दिले नाहीत, त्यांना मी पैसे दिले आहेत. आता मला रु. ५०,०००/— द्या. मी सर्वांना सांभाळतो. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, माझेकडे एवढे पैसे नाहीत. मी यापुर्वी दोन वेळ मिळून तुम्हाला रु. ५०,०००/— दिले आहेत. आता माझेकडे पैसे नाहीत. तेव्हा श्री. खंडागळे मला म्हणाले की, मला रु. ४०,०००/— देवून मॅटर बंद करुन टाक.

मला श्री. खंडागळे, बी.एम.सी. इंजिनियर यांना लाच देण्याची इच्छा नाही. तसेच त्यांचेशी माझा कोणताही आर्थीक देवाण—घेवाणीचा व्यवहार नाही, व त्यांची माझी कोणतीही दुश्मनी नाही. मी दिनांक १४/०३/२०१८ रोजी श्री. खंडागळे यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी मुंबई येथे आलो. तेथे मी वरिष्ठ अधिकारी यांना भेटलो. त्यांनी माझी तक्रार ऐकूण घेतली व मला सहाय्यक पोलीस आयुक्त क्षिरसागर व पोलीस निरीक्षक गणेश धोक्रट यांची भेट घालून दिली. त्यानंतर पो.नि. गणेश धोक्रट यांनी मला त्यांचे केबीनमध्ये घेवून गेले व तेथे मला दोन शासकिय पंचांची ओळख करुन दिली व मला माझा तक्रार अर्ज देण्यास सांगितले असता माझे शिक्षण मुंबई मध्ये गुजराथी माध्यमातून झालेले असल्याने मला मराठी व हिंदी वाचता येते व लिहीता येत नसल्याने मी सांगितल्या प्रमाणे पो.नि. धोक्रट यांनी माझी तक्रार लिहून घेतली व मी ती तक्रार वाचून पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे असल्याने त्याचेवर मी सही केली आहे.

माझी तक्रार लिहून घेतल्या नंतर माझे तक्रारीची दोन शासकिय पंचासमोर पडताळणी करणार असल्याचे मला पो.नि. गणेश धोक्रट यांनी सांगितले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. धोक्रट साहेब व स.पो.आ. क्षिरसागर साहेब यांनी पंचांसमक्ष माझे वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यांनंतर सापळा पथकातील अधिकारी, अंमलदार व पंच यांचेसह शासकीय वाहनाने वरळी ॲन्टी करप्शन ऑफिस येथून सी लिंक रोड, इस्टर्न एक्सप्रेस हायवेवरुन मालाड (पूर्व) येथे साई बाबा मंदिर जवळ, शामप्रसाद मुखर्जी चौक येथे पोहोचलो. तेथे मला पोलीस निरीक्षक श्री. धोक्रट साहेब यांनी सापळा कार्यवाही व पडताळणी संदर्भात सुचना दिल्या. सुचनांच्या अनुषंगाने मला व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. एन.जे. रेडकर यांचेसोबत रिक्षाने पी—उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम), मुंबई येथे श्री. खंडागळे, कनिष्ठ अभियंता यांना त्यांचे कार्यालयात भेटण्यासाठी गेलो. कार्यालयाचे गेटवर मला वॉचमने आडवले असता मी त्यांस श्री. खंडागळे साहेबांना भेटणेस जात असल्याचे सांगितले.

Kalpesh. B. Shah

(Kalpesh. B. Shah)

तेव्हा वॉचमनने मला श्री. खंडागळे यांना फोन करा नंतर जावा असे सांगितल्याने गेटवरुन माझे मोबाईल फोनवर श्री. खंडागळे यांचेशी संपर्क साधला असता त्यांनी मला सांगितले की, ते सद्या बी.एम.सी. मुख्य कार्यालय, सी.एस.टी, मुंबई येथे आहेत. त्यानंतर मी त्यांचे कार्यालयात न जाता पंच श्री. रेडकर यांचेसह रिक्षाने परत पोलीस अधिकारी थांबले होते तेथे आलो. पो.नि. गणेश धोक्रट यांनी माझे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केले नंतर मला घडलेली हकिगत विचारली त्यानंतर श्री. धोक्रट साहेब व स.पो.आ क्षिरसागर यांनी दिनांक १५/०३/२०१८ रोजी सकाळी ०९.००वा. पुन्हा ला.प्र.वि. कार्यालयात येण्यास सांगितले त्यानंतर मी माझे घरी निघून गेलो.

दिनांक १५/०३/१८ रोजी सकाळी पुन्हा मी ला.प्र.वि, मुंबई कार्यालयात मी सकाळी ०९.०० वा. हजर झालो असता पो.नि. धोक्रट साहेब व स.पो.आ. क्षिरसागर साहेब हजर होते. त्यांनी पंचांसमक्ष माझे पुन्हा वक्तव्य डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत केले. त्यानंतर सापळा पथकातील अंमलदार व पंच यांचेसह शासकीय वाहनाने वरळी अॅन्टी करप्शन ऑफिस येथून सी लिंक रोड, इस्टर्न एक्सप्रेस हायवेवरुन मालाड (पूर्व) येथे साई बाबा मंदिर जवळ, शामप्रसाद मुखर्जी चौक येथे पोहोचलो. तेथे मला पोलीस निरीक्षक श्री. धोक्रट साहेब यांनी सापळा कार्यवाहीसंदर्भात सुचना दिल्या. सुचनांच्या अनुषंगाने मला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून पंच श्री. एन. जे. रेडकर यांचेसोबत रिक्षाने पी– उत्तर विभाग, लिबर्टी गार्डन, मालाड (पश्चिम), मुंबई येथे श्री. खंडागळे, कनिष्ठ अभियंता यांना भेटण्यासाठी गेलो. श्री. खंडागळे यांना त्यांचे कार्यालयात भेटले असता त्यांनी माझेकडे पैशाची मागणी केली असता आता माझेकडे पैसे नाहीत असे सांगितले असता त्यांनी मला सांगितले की, ते वासनवाला बिल्डीग येथे दुपारी १३.०० ते १३.३० वा. चे दरम्यान मी येतो असे सांगितले. त्यानंतर मी व पंच श्री. रेडकर यांचेसह रिक्षाने परत पोलीस पथक थांबले होते तेथे आलो. तेथे माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पो.नि. धोक्रट यांनी काढून बंद केले. पो.नि. धोक्रट व सपोआ क्षिरसागर यांना मी घडलेली हकिगत सांगितली. पो.नि. धोक्रट यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर पंचा समक्ष चालू करुन श्री. खंडागळे यांनी पैशाची मागणी केल्याची खात्री केली त्यानंतर आम्ही पोलीस पथकासह माझे वासनवाला बिल्डींग, हाजी बापू रोड, मालाड (पूर्व), मुंबई–९७ येथे आलो. तेथे पोलीस वाहनामध्ये मी माझेकडील रु.४०,०००/–(रु.२०००च्या भारतीय चलनातील वीस नोटा) पोनि धोक्रट यांचेकडे दिल्या असता त्यांनी सदर नोटांचे छायांकित प्रती काढून त्यावर उपस्थित पंचांच्या सहया घेतल्या तसेच पोनि धोक्रट यांनी देखील स्वाक्षरी केली. त्यानंतर पोनि धोक्रट यांनी रु. ४०,०००/–(रु.२०००च्या वीस भरतीय चलनातील नोटा) एकूण वीस नोटांना पोलीस वाहनावरील पोलीस नाईक चालक क्र.९८०८२६/ शिवथरे यांचेमार्फत पंचासमक्ष अॅथ्रेसिनची पावडर कापसाच्या बोळयाने लावली व त्या नोटा पोलीस चालक शिवथरे यांनी त्यांचे हाताने माझे पॅन्टचे उजव्या खिशात ठेवल्या. त्यानंतर पो.नि. धोक्रट यांनी श्री. खंडागळे यांनी पैसे स्विकारल्या नंतर खिशातील रुमाल काढून तोंडावरुन फिरवून इशारा देण्यास सांगितले व माझे बनियनचे आतील बाजूस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावले व पंच

श्री. रेडकर यांचेसह वासनवाला बिल्डींगमध्ये श्री. खंडागळे यांची वाट पहात थांबण्यास सांगितले व पोलीस पथक वासनवाला बिल्डींगचे समोरील हाजी बापू रस्त्यावर मी त्यांना दिसेल अशा प्रमाणे थांबले.

साधारण १७.५५ वा. चे दरम्यान श्री. खंडागळे यांनी माझे मोबाइलवर फोन करुन मला गोल गार्डनचे बाजूला जय मातादी ऑफिस, मालाड (पूर्व) येथे बोलाविले. त्यानंतर सदरची माहिती पंच श्री. रेडकर यांचे मार्फत पोलीस पथकास दिली व माझे मो. सायकलवर मी व पंच श्री. रेडकर यांना बसवून माझें मो.सायकलचे मागून पोलीस पथक त्यांचे वाहनामधून गोल गार्डनचे बाजूला मालाड (पूर्व) येथे जय मातादी ऑफिस जवळ गेलो. मी जय मातादी ऑफिसमध्ये गेलो असता ऑफिसमध्ये जागा अपूरी असल्याने पंच श्री. रेडकर हे ऑफिसचे बाहेर माझेकडे लक्ष देवून थांबले. सदर ऑफिसमध्ये श्री. खंडागळे एकटेच हजर होते. त्यांनी मला पैशा बद्दल विचारणा केली असता मी माझे पॅन्टचे उजव्या खिशातील रु. ४०,०००/- काढुन श्री. खंडागळे यांना दिले असता त्यांनी ते स्विकारुन सदरची रक्कम पॅन्टचे मागील डाव्या खिशात ठेवली व जय मातादी ऑफिसमधून बाहेर आले. मीही त्यांचे सोबत बाहेर आलो व सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना श्री. खंडागळे यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या बाबत ठरल्याप्रमाणे माझे खिशातून रुमाल काढून तोंडावरुन फिरवून रक्कम स्विकारल्याचा इशारा केला. तद्नंतर सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी श्री. खंडागळे यांना कार्यालयाचे बाहेर ताब्यात घेतले.

तरी श्री. खंडागळे यांनी माझे घराच्या दुरुस्तीचे कामाची बी.एम.सी.कडून परवानगी न घेतल्याने व त्याबाबत तक्रारी प्राप्त झाल्याचे सांगून सदर काम चालू ठेवण्यासाठी वेळोवेळी रु. ५०,०००/- घेतले व दिनांक १५/०३/२०१८ रोजी पुन्हा माझेकडून रु. ४०,०००/-लाचेची मागणी करुन स्विकारली म्हणून माझी श्री. खंडागळे यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठीमध्ये टंकलिखीत केला असून तो मी वाचून दाखविला आहे. तसेच सदर जबाब माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष,

Ganesh Dhokat
( गणेश धोकट )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

Kalpesh B. Shah
(Kalpesh B. Shah)